कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका, बीट पिंपळगाव, ए.बा.वि.से.यो. प्रकल्प-पाथर्डी, जि. अहिल्यानगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
महिला व बाल विकास विभाग
आदेश क्र. एबाविसेयो/कार्या-०१/537/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केल्याप्रमाणे

संदर्भ :-१. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन /दोषारोपत्र जा .क्र एबाविसेयो/कार्या-०१/६१२/२०२५ अहिल्यानगर दिनांक- ०२/१०/२०२५

२. या कार्यालयाकडील आदेश क्र. एबाविसेयो/कार्या-०१/६७०/२०२५दिनांक- १४/११/२०२५ (चौकशी अधिकारी नियुक्ती)

३. सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ /सी.आर.१४९/२०२५, दिनांक- ०१/०९/२०२६, प्राप्त दिनांक २९/०९/२०२६

४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ट ७.१

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका, बीट पिंपळगाव, ए.बा.वि.से.यो. प्रकल्प-पाथर्डी,जि. अहिल्यानगर यांना त्यांनी कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावण्यात आले होते.

संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचे गैरवर्तना विरुद्ध विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणूक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक ३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

आरोप क्रमांक	विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष
आरोप क्र.१	आरोप सिध्द होत नाही.

वरीलप्रमाणे श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचे वर चौकशी करण्यात आलेला दोषारोप सिध्द झालेला नाही. विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ट ७.१नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविण्यात येत आहे.सबब श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका, बीट पिंपळगाव, ए.बा.वि.से.यो. प्रकल्प-पाथर्डी,जि. अहिल्यानगर यांना प्रस्तुत विभागीय चौकशीमधुन दोषमुक्त करण्यात येत आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक ---------- असा आहे.
20261104080021

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 13:58:52
आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-श्रीमती मंगल हरिभाऊ पाखरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका, बीट पिंपळगाव, ए.बा.वि.से.यो. प्रकल्प-पाथर्डी,जि. अहिल्यानगर द्वारा बाल विकास प्रकल्प अधिकारी,प्रकल्प पाथर्डी जि. अहिल्यानगर.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.